मटा भूमिका

# मेट्रो वेळेत सुरू व्हावी

राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो मार्गिका असलेल्या आरे-कफ परेड या मेट्रो ३ मार्गिकेवरील दहा स्थानकांपैकी चार स्थानके पूर्णत्वाच्या दिशेने असणे, ही मुंबईकरांसाठी आनंदाची बाब आहे. आता उर्वरित स्थानकांची कामे झपाट्याने व्हावीत. प्रामुख्याने विद्युतीकरणाची कामे काही प्रमाणात मागे आहेत. ती पूर्ण होणे गरजेचे आहे. ही मार्गिका ज्या भागांतून जाणार आहे, तो मार्ग कर्मचारी वर्गासाठी महत्त्वाचा आहे. सध्या या मार्गिकेच्या उत्तरेकडील भागांत बसने प्रवास करताना मुंबईकरांचे प्रचंड हाल होत आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांमधून प्रवास करणे अत्यंत त्रासाचे झाले आहे. त्यातून त्यांची सुटका होण्यासाठी नागरिक मेट्रो सुरू होण्याची चातकाप्रमाणे प्रतीक्षा करीत आहेत. त्यामुळेच डिसेंबरची 'डेडलाइन' प्रशासन पाळेल, अशी अपेक्षा सर्वसामान्य मुंबईकर करत आहेत.